# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

शासकीय कुटीर क्र.७, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई – ४०० ०२१.

दुरध्वनी क्र. :- ०२२-२२०४३३५४/२२०४५७०६ फॅक्स क्र.०२२ – २२८८६६६६

Email Add :- dclmms@yahoo.in / dclmms_complaints@yahoo.com

क्र.वैमाशा- /वैमाशा/नियम,२०११/२०१५/१३९ दि. ०९ फेब्रूवारी,२०१५

प्रति,

सर्व उप नियंत्रक,
वैध मापन शास्त्र.

विषयः- वैध मापन शास्त्र, अधिनियम, २००९
महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११.

संदर्भः- १) या कार्यालयाचे आदेश क्र. वैमाशा/मच्छिमार/आदेश/२०१४/७३९६ दि.२७/११/२०१४
२) या कार्यालयाचे आदेश क्र. वैमाशा/साखर/आदेश/२०१४/७७९६ दि.२९/१२/२०१४

या कार्यालयाच्या उपरोक्त आदेशांव्दारे मच्छिमारांकडून मासे विकत घेणारे सर्व व्यापारी/खरेदीदार तसेच निर्यातदारांना आणि साखर कारखान्यांना वर्ग-३ अचुकतेच्या इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणांचाच वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सदर आदेश सर्व संबंधितांना बजावण्यात आलेले आहेत.

उक्त आदेशामध्ये दिलेल्या निर्देशांचे सर्व संबंधितांनी पालन करणे बंधनकारक आहे. सदर आदेशांचे पालन करण्यात आले आहे किंवा कसे याबाबत आपल्या क्षेत्रीय अधिका-यांना संबंधित ठिकाणी भेटी देऊन खातरजमा करण्याबाबत निर्देश दयावेत तसेच सदर आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्यास महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम,२०११ च्या नियम ४(४) च्या उल्लंघनाबददल योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबतही त्यांना निर्देशित करावे. याबाबतचा अनुपालन अहवाल सात दिवसांत सादर करावा.

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई